# ।। श्री तीर्थ महिमा स्तोत्र।।

श्री गणेशाय नमः ।।
श्री दत्तात्रेयाय नमः ।।
श्री स्वामी समर्थाय नमः ।।

प्रत्यक्ष गंगा जलकुंभी आली। श्री दत्त स्वामींसी ती स्नान घाली।।
महासिध्द आले पदतीर्थ घ्याया। महिमा तयाचा कळे ना जगाया।।
असे हे अमृत तीर्थ करिसी मृतास संजीवन।।
करावे नव बिंदू तीर्थास आपूल्या जठरामध्ये संधारण।।
अमोल तो प्रत्येक बिंदू सारे करील क्षालन।।
शीतल आल्हाददायी तो करी परमार्थाचे पालन।।
प्रथम बिंदू जरी असेल सौम्य व शीतल।।
षड्रीपूच्या पाशातूनी सोडोनी मन हे स्थिर करेल।।
द्वितीय असा तो बिंदू राहूनी रवि समान प्रखर।।
नाशवोनी तम अंधःकारास करेल सत्व गुणाचा प्रसार।।
सुखकारी सोमवत मौलिक आहे जो दत्त बिंदू।।
डुंबोनी मायासागरातून दाखविसी सद्गुरुंचा साक्षात्कार।।
मारोनी रोगास वेद तो बिंदू आहे वैद्यराज।।
करवी भक्तास सिध्द तोची खरा भक्तराज।।
नाग बिंदू हा परम श्रेष्ठ जो करिता धारण।।
तृप्ती होऊनी पितराची करी शास्त्राचे पालन।।
अग्निसमान शिवशक्तीचा कार्तिक बिंदू आहे जो महान।।
जाळोनी पाश ऋण दारिद्रयाचा करवी तो धनवान।।
विशाल अन् अक्षय जो सागर बिंदू सप्तम।।
नाशोनी भुतादिक आहे सिध्द तेची कर्म।।
माता-पित्याचा प्रेम सागर जणू हा पालक वसुबिंदू।।
दूर करविसी भयास अन् दुःखास आहे तो परमसिंधु।।
नवम् बिंदु दाखविसी सुख समृध्दीची वाट।।
घालोनी पायघड्या तीजवर चरणी हा सद्गुरूंचा थाट।।

करोनी धारण नव बिंदू होईल पाशांचे निर्दालन।।
सांडोनी अहंभाव होऊ स्वामी चरणी लीन।।
।। श्री स्वामी समर्थार्पणमस्तु।।

श्री स्वामी समर्थ नवशती अमृतसार या मौलिक ग्रंथाचे पारायण करताना एका फुलपात्रात पाणी घेऊनी त्यात तुळशीपत्र ठेवणे, पारायणाच्या संस्काराने झालेले तीर्थ घेणे.
अशा तीर्थाचे नवबिंदू सेवन केल्याने होणारी फलश्रुती सद्‌गुरुंनी तीर्थ महिमा स्त्रोत्रात वर्णिली आहे.

